जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८९३ दिनांक - २२/१२/२०२३**

वारजे पोलीस स्टेशन,पुणे शहर

# अविनाश उर्फ आव्या सुरेश गंपले (टोळी प्रमुख) व त्यांचे इतर ३ साथीदार यांचे वर मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक १९/११/२०२३ रोजी सदगुरु किराणा स्टोअर जवळ, अमरभारत सोसायटी, वारजे माळवाडी या ठिकाणी फिर्यादी व त्याच्या मित्राला रस्त्यामध्ये अडवून हातांमधील लोखंडी हत्यार व लाकडी बांबूचा धाक दाखवून फिर्यादीला कमरेवर व पायावर मारहाण करुन, शिवीगाळ व धमकी देवून फिर्यादीच्या पॅंटच्या खिशातील रोख रक्कम रुपये ७००/-जबरदस्तीने काढून घेतले सदर ठिकाणी दहशत निर्माण केली त्यामुळे लोक घाबरुन पळून गेले सदर घटनाबाबत फिर्यादी यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाणे ये़थे येवुन फिर्याद दिल्यांने गु.र.नं.४७९/२०२३ भा.दं.वि. कलम ३९४,३२३,३४१,५०४,५०६(२),३४,आर्म ॲक्ट ४(२५),मपोका सह कलम ३७(१)(३), क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्यांचे तपासा दरम्यान सदरचा गुन्हा इसम नामे **१) अविनाश सुरेश गंपले ऊर्फ आव्या वय १९ वर्षे, रा. सर्वेनं ४५/२ महादेव मंदिराजवळ, अमरभारत सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे २) सतीश पवन राठोड, ऊर्फ सत्यपाल वय १८ वर्षे, रा. विठ्ठलनगर पाण्याचे टाकीजवळ वारजे माळवाडी, पुणे. ३) विशाल संजय सोनकर, वय १९ वर्षे, रा विद्याविहार सोसायटी दांगट पाटील नगर, शिवणे वारजे माळवाडी, पुणे ४) एक विधीसंघर्षित बालक** यांनी केला असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले. निष्पन्न ०३ आरोपींना अटक करुन पोलीस कस्टडी घेवुन तपास करण्यात आला. व १ विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेवुन बाल न्यायालयात हजर करण्यात आले.

आरोपी नामे १) अविनाश सुरेश गंपले ऊर्फ आव्या (टोळी प्रमुख) याने आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवून स्वतःची संघटीत टोळी तयार करून अपराध केलेले असून यातील आरोपी यांनी जबरी चोरी करणे, जबरी चोरी करताना इच्छापूर्वक दूखापत करणे, अविचाराने दुस-यांच्या जिवीतास किंवा व्यक्तीगत सुरक्षिततेस धोका निर्माण करणे, इच्छापूर्वक दुखापत करणे, नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान करुन तोडफोड करणे, बेकायदेशिर शस्त्र जवळ बाळगणे, पोलीसांच्या आदेशाचा भंग करणे, सर्वसामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करणे यासारखे गंभीर गुन्हे वारंवार केले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटित दहशतीचे मार्गाने स्वत:चे आर्थीक फायद्या करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने, तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याचे प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१) (ii),व ३(४), प्रमाणेचा अंतर्भाव करणेकामी वारजे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल जैतापुरकर यांनी मा.पोलीस उप आयुक्त परि-३,पुणे शहर, श्री.सुहेल शर्मा यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केला.

सदर सदर प्रकरणाची छाननी करुन वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे गु.र.नं ४७९/२०२३ ३९४,३२३,३४१,५०४,५०६(२)३४, आर्म अॅक्ट ४(२५) म.पो.अधि.कलम ३७(१)(३)सह १३५ क्रि.लॉ.अमेंडमेंट ७ या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४),या कलमाचा समावेश करणे बाबत मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस आयुक्त,कोथरूड विभाग पुणे शहर श्री.भिमराव टेळे हे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार) श्री.रामनाथ पोकळ मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि-३, पुणे, श्री सुहेल शर्मा, मा.सहा. पोलीस आयुक्त, कोथरूड विभाग, पुणे श्री.भिमराव टेळे, यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल जैतापुरकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय कुलकर्णी, सहा.पोलीस निरीक्षक अमोल ओलेकर, पोलीस उपनिरीक्षक तृप्ती पाटील, निगराणी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विशाल मिंडे, पोलीस अंमलदार संभाजी दराडे, विजय खिलारी, नितीन कातुर्डे, ज्ञानेश्वर गुजर, रामदास गोणते यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईन लक्ष देवुन,शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही १०३ वी कारवाई आहे.**